# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, संगमनेर

## मराठी विभाग

# मराठी भाषा महती व ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त मराठी साहित्यिक

# मराठी भाषा महती

मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. मराठी ही भारतातील २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. मराठी महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, भारत देशात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे ९ कोटी आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. मराठी भाषा भारतातील प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे आधुनिक रूप आहे. मराठी भाषेचा गौरव ज्ञानेश्वरांनी त्यांच्या साहित्यातून ही केलेला दिसून येतो. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून त्याला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे

# मराठी भाषेचा इतिहास

मराठी भाषेचा उदय संस्कृतचा प्रभावाखाली निर्माण झालेल्या प्राकृत भाषेचा महाराष्ट्री या बोलीभाषेपासून झाला, असे बहुतांशी मानले जाते. पैठण (प्रतिष्ठान) येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली. मराठी ही भाषा देवनागरी लिपी वापरून लिहिली जाते. इ.स. १२७८ मध्ये म्हाइंभट यांनी लीळा चरित्र लिहिले. त्यानंतर इ.स. १२९० मध्ये ज्ञानेश्वरी या ग्रंथाची रचना ज्ञानेश्वरांनी केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली आणि पेशव्यांनी या साम्राज्याचा विस्तार केला. त्यानंतर मराठी भाषेस राजाश्रय मिळाला. इ.स. १९४७ नंतर स्वतंत्र भारत देशाने मराठीला अधिकृत राज्यभाषेचा दर्जा दिला. इ.स. १९६० मध्ये मराठी भाषिकांच्या एकसंध महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि मराठीस राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला.

# ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी साहित्यिक

भारतातील साहित्य क्षेत्रात ज्ञानपीठ पुरस्कार हा सर्वोच्च पुरस्कार मानला जातो.आतापर्यंत ५३ पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. त्यात खालील साहित्यिकांना हा पुरस्कार देऊन मराठी भाषेचा गौरव करण्यात आला आहे.

| अ.नं. | साहित्यिकाचे नांव | प्राप्त वर्ष | साहित्य |
|---|---|---|---|
| १ | वि.स. खांडेकर | १९७४ | **ययाती** कादंबरी |
| २ | वि.वा. शिरवाडकर | १९८७ | **नटसम्राट** नाटक |
| ३ | विंदा करंदीकर | २००३ | **अष्टदर्शने** काव्यसंग्रह |
| ४ | भालचंद्र नेमाडे | २०१४ | **हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ** कादंबरी |